<u>उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना</u>

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २२७ /२०२४ दि. ०८/११/२०२४

## –: <u>वाहतूक नियंत्रण अधिसूचना</u> :–

**ज्याअर्थी,** उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत **<u>विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४</u> चे अनुषंगाने मतदान मोजणीची प्रक्रीया दिनांक २३/११/२०२४ रोजी मा. निवडणूक निर्णय अधिकारी १४१ – उल्हासनगर विधानसभा मतदार संघ यांचे कार्यालय, मा. प्रातं कार्यालय, पवई चौक, उल्हासनगर –३ येथे पार पडणार आहे.** सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) शास्त्री चौक, उल्हासनगर –३ येथुन हिरा घाट–पवई चौक मार्गे उल्हासनगर –४,५ व विठ्ठलवाडी व कोळसेवाडीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शास्त्री चौक, उल्हासनगर –३** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने शास्त्री चौक, उल्हासनगर –३ येथून कल्याण रोडने सरळ छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार – सम्राट चौक येथुन डावीकडे वळुन धर्मविर आनंद दिघे ब्रिज मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) उल्हासनगर – ४, ५ व विठ्ठलवाडी कडुन पवई चौक, उल्हासनगर – ३ मार्गे प्रांत कार्यालय, हिराघाट चे दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पवई चौक, उल्हासनगर – ३** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने पवई चौकातुन डावीकडे वळुन – प्रकाश ऑटोमोबाईल समोरुन – हडकाई माता चौक – स्मशानभुमी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसूचना **दिनांक २३/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० ते सायंकाळी १८:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ४, उल्हासनगर
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
सहा. पोलीस आयुक्त, अंबरनाथ विभाग/वाहतुक शाखा, उल्हासनगर
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर शहर – ठाणे पोलीस पत्रक

CS CamScanner

उल्हासनगर वाहतूक उपविभाग




Scanned with OKEN Scanner
CamScanner